महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
क्रमांक ३८६० / क-३ (लेखा)
विधानभवन, मुंबई.
दिनांक : मार्च, २०२४
22 MAR 2024

# :: परिपत्रक ::

विषय : ई-कुबेर प्रणालीमार्फत त्रयस्थ अदाता यांच्या बँक खात्यात थेट रक्कम जमा करणेबाबत.

संदर्भ : १) वित्त विभाग शासन परिपत्रक क्रं-संकीर्ण २०२०/प्र.क्रं-६/२०/कोषा प्रशा-५, दिनांक ११/०३/२०२०

२) वित्त विभाग शासन निर्णय क्रं-संकीर्ण २०२० /प्र.क्रं.-६/२०/कोषा प्रशा-५, दिनांक १२/११/२०२१.

३) अधिदान व लेखा कार्यालय यांचे परिपत्रक क्रं-अलेका/संगणक शाखा/ ई-कुबेर परिपत्रक २०२१-२२ दिनांक १६/११/२०२१.

४) "क-३ लेखा" कक्षाचे परिपत्रक क्रमांक १८८३९/क-३ दिनांक ०९/१२/२०२१

५) संचालनालय, लेखा व कोषागारे यांचे पत्र क्रमांक संलेवको/सुधारणा शाखा/ ई-कुबेर / २०२४/११४ दिनांक १९/०३/२०२४

संदर्भ क्रं-१ नुसार अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांचेकडून होणारी सर्व प्रकारची प्रदाने आहरण व संवितरण अधिकारी यांच्या थेट बँक खात्यात तसेच, निवृत्तीवेतन धारकांचे प्रथम प्रदान व मृत्यू-नि- सेवानिवृत्ती उपदान यांची प्रदाने त्यांच्या संबंधित बँक खात्यात ई-कुबेर प्रणालीद्वारे जमा करण्यात येत होती. संदर्भ क्रं-२,३ व ४ नुसार विविध विभागामार्फत कंत्राटदार/पुरवठादार अशा त्रयस्थ अदात्यांना तसेच, शासकीय अधिकारी /कर्मचारी यांच्या देयकांचे (स्वग्राम, महाराष्ट्र दर्शन, इतर दौऱ्यांची देयके वैद्यकीय खर्चाची देयके) प्रदाने भारतीय रिझर्व्ह बँकेने विकसित केलेल्या ई-कुबेर या आज्ञावलीद्वारे करण्यात येते.

संदर्भ क्रं-५ पत्रान्वये लेखा व कोषागारे संचालनालय कार्यालयाने दिनांक ०१ एप्रिल, २०२४ रोजीपासून निवृत्तीवेतन धारकांचे प्रथम प्रदान व मृत्यू-नि- सेवानिवृत्ती उपदान यांची प्रदाने, विविध विभागामार्फत कंत्राटदार/पुरवठादार अशा त्रयस्थ अदात्यांची प्रदाने, शासकीय अधिकारी /कर्मचारी यांचे स्वग्राम, महाराष्ट्र दर्शन, इतर दौऱ्यांची देयके तसेच, वैद्यकीय खर्चाची देयके यांची प्रदाने ई-कुबेर प्रणालीद्वारे करणे अनिवार्य करण्यात आलेली आहेत. त्यानुषंगाने या सचिवालयातील सर्व अधिकारी /कर्मचारी यांना कळविण्यात येते की त्यांनी स्वत:ची ई-कुबेर नोंदणी झाली आहे किंवा नाही याची खात्री

क-३ (लेखा) कक्षाकडून करून घ्यावी जेणेकरून स्वग्राम, महाराष्ट्र दर्शन, इतर दौऱ्यांची देयके तसेच, वैद्यकीय खर्चाची देयके यांची प्रदाने लवकरात लवकर करणे सोईचे होईल.

ज्या अधिकारी /कर्मचारी यांची ई-कुबेर नोंदणी झालेली नसल्यास त्यांनी रद्द केलेल्या धनादेशाची मुळ प्रत, आधार कार्ड व पॅन कार्डची साक्षांकित प्रत क-३ (लेखा) शाखेत दिनांक १५/०४/२०२४ पर्यंत जमा करण्यात याव्यात. या सचिवालयातील जे अधिकारी /कर्मचारी ई-कुबेर नोंदणीकरिता आवश्यक माहितीसह संबंधित कागदपत्रे दिनांक १५/०४/२०२४ पर्यंत क-३ लेखा कक्षास सादर करणार नाहीत त्यांची ई-कुबेर नोंदणी न झाल्यास त्यांच्या देयकाच्या प्रदानास होणाऱ्या विलंबाकरिता क-३ (लेखा) शाखा जबाबदार राहणार नाही.

(स्वाती ताडफळे)
उपसचिव तथा नियंत्रण अधिकारी
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी/ कर्मचारी वर्ग.
२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष
३) संगणक कक्ष